■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – ३२४ ■ सोमवार दि.११ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 324 ■ Monday Dt. 11 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

रोजगार स्वप्नं चिरडली : काम देण्याचे आमिष दाखवून हैद्राबादच्या वीस वर्षीय तरुणीला फसवले?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कंर्दनकाळ
सायं.दैनिक
महाराष्ट्र आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

तृतीयपंथीयासह चौघांकडून हैद्राबादच्या तरुणीवर बीडमध्ये केला आळीपाळीने बलात्कार!

अस्वल आंब्यात मंदिराजवळील खोलीत नराधमांचं अमानुष कृत्य; मानवतेला काळिमा फासणारी घटना?

बीड । प्रतिनिधी

बीडमध्ये गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याचं चित्र आहे. अशातच आणखी एक मानवीतेला काळिमा फासणारी घटना घडली आहे. तृतीयपंथीयासह चौघांनी मिळून एका तरुणीवर आळीपाळीने बलात्कार केल्याची गंभीर बाब उघडकीस आली आहे. आरोपींनी तिच्यावर अमानुष अत्याचार केला. यामध्ये एक तृतीयपंथीय व तिघा पुरुषांचा समावेश असून, घटनेनंतर बीड शहरात संतापाची लाट उसळली आहे. सामाजिक संघटनांकडून आरोपींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. तृतीयपंथींने भयानक कृत्य करून पीडीतेला आपल्या साथीदारांच्या हवाली केलं, नंतर आळीपाळीने तिघांनी तिच्यावर बलात्कार केला याप्रकरणी पोलिसांनी तृतीयपंथीयासह चौघांवर अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी तरुणीची सुटका करून तिघांना केले गजाआड; तृतीयपंथी आरोपी अजूनही फरार?

या घटनेतील पीडिता (वय वर्ष २०) मुळची हैद्राबाद येथील रहिवासी असल्याची माहिती आहे. ती मुंबईत घरगुती साफसफाईच्या कामावर होती. पीडितेनं दाखल केलेल्या तक्रारीनुसार, ती मुंबईहून हैद्राबादला जाण्यासाठी रेल्वेने निघाली होती. भूक लागल्याने ती परळीत उतरून एका हॉटेलमध्ये जेवत असताना तृतीयपंथी पूजा गुट्टे हिची नजर तिच्यावर पडली.

पुजाने तिच्याकडून तिचीच माहिती काढून घेत तिची गरज जाणून घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी तृतियपंथीयानं तिला काम देण्याची भुलथाप दिली. त्यानंतर पूजाने सतीश अण्णासाहेब मुंडे (रा. डाबी, ता. परळी) आणि मोहसीन सरदार पठाण (रा. शिवाजीनगर, परळी) या दोघा साथीदारांना बोलावून घेतले. त्यानंतर ते तिघे पिडीतेला मोटारसायकलवर बसवून अस्वलआंबा येथील भागवत अंगद कांदे या चौथ्या साथीदाराकडे घेऊन गेले. तिथे एका मंदिराशेजारी असलेल्या भागवत कांदे याच्या मालकीच्या खोलीमध्ये घेऊन गेले. नंतर जीवे मारण्याची धमकी देत तिला मारहाण केली. नंतर तिघांनी तिच्यावर आळीपाळीने जबरदस्ती करत बलात्कार केला.

दरम्यान, गावात सुरु असलेल्या या घृणास्पद प्रकाराची माहिती एका सजग नागरिकाने शनिवारी पहाटे डायल ११२ वर कॉल करून पोलिसांना माहिती दिली. या माहितीची गांभीर्याने दखल घेत परळी ग्रामीण ठाण्याचे सहा. फौजदार टोले यांनी अस्वलआंबा गाठले आणि पिडीतेची सुटका केली.

यावेळी पोलिसांना पाहताच पूजाने घटनास्थळाहून पळ काढला. मात्र सतीश मुंडे, मोहसीन पठाण आणि भागवत कांदे यांना बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आले. या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

एकलव्य जयंती मिरवणुकीत पिस्तूल दाखवत दहशत; तिघांवर गुन्हा

आष्टी । प्रतिनिधी

बीड (प्रतिनिधी) – विना परवाना बेकायदेशिररित्या जयंती मिरवणूक काढून त्यामध्ये एक तरूण त्याच्याजवळील विना परवाना पिस्तुल हातात घेऊन मिरवल्याचा प्रकार आष्टी तालुक्यातील शिराळ येथे घडला. या प्रकरणी पिस्तुल हातात घेऊन दहशत निर्माण करणाऱ्या तरूणासह विना परवाना मिरवणूक काढल्याप्रकरणी तिघांविरूध्द आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. आष्टी तालुक्यातील मौजे शिराळ येथील भिल्ल वस्तीवर ९ ऑगस्टरोजी सायंकाळी विना परवाना बेकायदेशिररित्या एकलव्य जयंती मिरवणूक काढण्यात आली. त्यामध्ये निलेश उर्फ तात्यासाहेब तुकाराम गांगुर्डे याने त्याच्याजवळील विना परवाना पिस्तुल हातामध्ये घेऊन सार्वजनिक कार्यक्रमात दहशत निर्माण केली. मौजे शिराळ (ता. आष्टी) येथील भिल्ल वस्तीमध्ये काढण्यात आलेल्या एकलव्य जयंती मिरवणुकीत विनापरवाना पिस्तूल हातात धरून सार्वजनिक ठिकाणी दहशत निर्माण केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध आष्टी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर घटना ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ ते ६ वाजेच्या दरम्यान घडली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी निलेश उर्फ तात्यासाहेब तुकाराम गांगुर्डे (रा. पारगाव, ता. पाटोदा) यांनी एकलव्य जयंती मिरवणुकीदरम्यान विनापरवाना पिस्तूल हातात घेतले होते. यामुळे मिरवणुकीत सहभागी तसेच परिसरातील लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या प्रकरणात त्याच्यासह राजू पाडुरंग पवार आणि विकास भाऊसाहेब बर्डे (दोघे रा. शिराळ, ता. आष्टी) यांच्यावरही कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी पोलीस कर्मचारी सद्दाम सत्तार शेख यांच्या फिर्यादीवरून कलम २२३, तसेच कलम ३/२५ भारतीय शस्त्र अधिनियमप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नरवाडे करत आहेत.

व्यापाऱ्याच्या परस्पर जीएसटी नंबरवर ७३ लाखांचा गैरव्यवहार

गेवराई । प्रतिनिधी

मगन दायमा बीडच्या गेवराई येथील व्यापाऱ्याचा जीएसटी नंबर ला स्वतःचा मोबाईल नंबर आणि ई-मेल रजिस्टर करून कर सल्लागार ने तीन वर्षात परस्पर ट्रेडिंग कंपन्यासाठी कोट्यावधीचे व्यवहार केले. ७३ लाख ६३ हजार ३६७ रुपयांचा गैरव्यवहार करून फसवणूक केली. व्यापाऱ्याला आयकर विभागाची नोटीस समन्स आल्यानंतर प्रकार उघड किस आला हा प्रकार २०२२ ते २०२५ या काळात मालन प्लाझा जवाहर कॉलनी भागात घडला.

गोविंद सत्यनारायण लाहोटी (रा. राजयोग प्राईट देवळाई परिसर) असे आरोपी कर सल्लागाराचे नाव आहे फिर्यादी मधुसूदन चतुर्भुज सोनी रा. गेवराई जिल्हा बीड यांचा गोळ्या बिस्किट व पान मटेरियलचा व्यवसाय असून श्री राजुरेश्वर ट्रेडर्स नावाने गेवराई येथे दुकान आहे आरोपी कर सल्लागार गोविंद लाहोटी यांच्याकडे त्यांनी २०१७ वस्तू व सेवा कराचे जीएसटी प्रमाणपत्र काढले होते तेव्हा लाहोटीने नोंदणीसाठी स्वतःचा मोबाईल नंबर आणि ईमेल वापरला होता त्यानंतर सोनी यांचे सर्व आर्थिक व्यवहाराचे काम

लाहोटीकडे दिले होते नोव्हेंबर २०२४ सोनी यांना आयकर विभागाचे समन्स व नोटीस आली. त्यात जीएसटी जीएसटी नंबर वरून होणारे व्यवहार लक्षात आले त्यांनी बीडच्या आयकर कार्यालयातून पत्र देऊन स्वतःचा मोबाईल नंबर आणि ई-मेल नोंदवून घेतला. लाहोटी याला संपर्क केला तेव्हा त्याने गैरव्यवहार केल्याचे सांगून सर्व डिमांड नील करून देतो असे कबूल केले. मात्र त्याने नंतर मोबाईल बंद करून टाकला वारंवार संपर्क केल्यानंतर त्याने पोलिसात तक्रार केली माझ्या मागेच फिरावे लागेल. अशी धमकी दिली ६ जानेवारी २०२५ रोजी आयकर ची दुसरी नोटीस आली. १० जानेवारी समन्स आले. लाहोटी उडवाउडवी करू लागला.

विवरण पत्रही भरले परस्पर

सोनी यांचे लहोटीने सीए नेतल खटोड अँड कंपनी यांच्यामार्फत चुकीचे २०२१ ते २४ पर्यंत असे तीन वर्षाचे आयकर विवरण पत्र परस्पर भरून घेतले. सोनी यांना व्यवसायात आज पर्यंत कधीही आयकर लागला नव्हता. मात्र लाहोटीने १ लाख३७ हजार ३४५ एवढा आयकर २०२३ – २४ मध्ये भरलेला आहे. तो सोनी यानी दोघांनाही दिलेला नसल्याचे तक्रारीत म्हटले आहे. सोनी यांनी फेब्रुवारी महिन्यात पोलीस आयुक्ताकडे तक्रार दिली होती त्यानंतर गुरुवारी (दि.७) जवाहर नगर पोलीस ठाण्यात लाहोटी विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बोगस बिल मारून कोट्यावधीचे व्यवहार

लाहोटीने सोनी यांच्या परस्पर धुव ट्रेडिंग एम. एम. ट्रेडिंग ग्लोबल ट्रेडिंग अँड कंपनी व इतर यांच्या नावावर आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये बनावट खरेदी रक्कम ८३ लाख दाखवून १६ लाखांचा जीएसटी २०२४-२५ मध्ये १ कोटी ३५ लाख आणि त्यावर ३५ लाखाचा गैरव्यवहार केला. २०२२-२३ मध्ये ९१ लाख ५५ हजार त्यावर २१ लाख ७० हजार २०२३-२४ मध्ये १ कोटी ६७ लाखांवर ३८ लाखांचा जीएसटी असा सोनी यांच्या जीएसटी वरून ७३ लाखांचा गैरव्यवहार केला.

आगारनांदूरमध्ये घरफोडी; दागिन्यांसह मोटारसायकलची चोरी

गेवराई । प्रतिनिधी

आगारनांदूर (ता. गेवराई) येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सोन्याचे दागिने आणि मोटारसायकल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. हा प्रकार ४ ऑगस्टच्या रात्री ११ वाजल्यापासून ५ ऑगस्टच्या पहाटे १.३० वाजेपर्यंत घडल्याचे पोलिसांनी सांगितले.

फिर्यादी बाबासाहेब प्रभाकर कोकरे यांच्या घरी चोरट्यांनी चराच्या गेट व दरवाजाचे कुलूप तोडून प्रवेश केला. लोखंडी कपाटातील लॉकर फोडून सोन्याचे दागिने लंपास केले. त्यानंतर बद्री शिवाजी काळे यांच्या घरासमोरील एमएच २० एसी १४२८ क्रमांकाची मोटारसायकलही चोरट्यांनी पळवून नेली. या चोरी त सोन्याचे डोरले (१.१०० ग्रॅम, किंमत ५,१००), सोन्याचे मणी व पीवर जोडवे (३,२६०), सोन्याचे मंगळसुत्र (७ ग्रॅम, २८,०००), दोन अंगठ्या (एकूण ४ ग्रॅम, १६,०००), नाकातली नथ (४,०००) आणि सोन्याचे 'ओम' (४,०००). एकूण किंमत ६०,३६० एवढा एकूण ऐवज चोरीस गेला आहे. या प्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस उपनिरीक्षक उदगीरकर करत आहेत.

केज तहसीलसमोर केविसंस चे १४ ऑगस्टपासून बसडेपो, रिंगरोड व शेतकरी प्रश्नावर उपोषण

केज । प्रतिनिधी

केज येथे बसडेपो सुरु करा, केज शहारासाठी रिंगरोड (बायपास किंवा उड्डाणपुल यापैकी हे सोयीचे व फायदयाचे असेल ते), केज शहरातील शेतकऱ्यांना राज्य व केंद्राच्या सर्व कृषी योजनांचे लाभ तात्काळ सुरु करा तसेच संजयगांधी निराधार योजना लाभार्थींची दलालांकडून होणारी लूट थांबवण्यासाठी तहसील कार्यालयाने थेट त्यांच्याशीच पत्रव्यवहार करावेत या प्रमुख मागण्यासाठी केज विकास संघर्ष समितीच्या वतीने येत्या शुक्रवार दि १४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजेपासून केज तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरु करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे समन्वयक सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी दिली आहे. या बाबतचे निवेदन सर्व संबंधित विभागाला समितीच्या वतीने देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, केज येथे बसआगार सुरु करण्यासाठी केज विकास संघर्ष समिती गेली अनेक वर्षांपासून पाठपुरावा करत आहे. यासाठी केज शहरात बीड रोड लगत साडेसात एकर जागा आरक्षित आहे. केज शहर सध्या खामगाव

-पंढरपूर व अहमदपूर-अहमदनगर या महामार्गाच्या जोडणीवर आहे. केज तालुका अंतर्गत एकशे दहा गांवे आहेत. दररोज हजारो प्रवाशी केज शहरातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रवास करतात. केज येथून बस गाड्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी केज येथे बसडेपो सुरु करावा तसेच या जागेवर नवीन इलेक्ट्रिक बसगाडयांना लागणारे भव्य चार्जिंग सेंटर उभा करावे अशी मागणी समितीने राज्य परिवहन महामंडळाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

केज शहरातुन वरील दोन्ही प्रमुख महामार्ग भवानी चौक ते श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकपर्यंत एकत्र येऊन पुढे जातात. या अंतरात शहरातील वाहतूक खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सर्व प्रकारच्या वाहणाबरोबरच अवजड वाहनांची संख्या वाढली आहे. यामुळे शहराच्या मध्यवर्ती भागातील महामार्गांवर अपघाताचे व सततची वाहतूक कोंडी होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. म्हणून केज शहरासाठी तात्काळ रिंगरोड (बायपास किंवा उड्डाणपूल यापैकी केज शहरासाठी जे सोयीचे व फायद्याचे असेल त्यास मंजुरी द्यावी अशी मागणी -श्रलेहेश्र संबंधित विभागाकडे केली आहे.

याव्यतिरिक्त केजच्या शेतकऱ्यांना केज येथे नगरपंच्यायत झाल्यापासून केंद्र व राज्य शासनाकडून दिल्या जाणाऱ्या शासकीय कृषी योजनांचा लाभ नाकारण्यात आला आहे. हे अत्यंत चुकीचे आहे. शासनाने शेतकऱ्यांमध्ये भेद करू नये. विशेष म्हणजे राज्यात जेवढ्या नगरपंच्यायत व नगरपरिषदा आहेत त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांवर तांत्रिक मुद्दे पुढे करून अन्याय केला जात आहे. तरी केज शहर नगरपंच्यायत अंतर्गत सर्व शेतकऱ्यांना तात्काळ सर्व शासकीय योजनांचे लाभ सुरु करावेत अशी मागणीही समितीने केली आहे.

समितीने केज तहसील अंतर्गत संजय गांधी व श्रावणबाळ निराधारांना मिळणाऱ्या लाभाची दलालांकडून होणाऱ्या लुटीबद्दल प्रश्न उपस्थित केला आहे. यापूर्वी या सर्व लाभार्थींना आपल्या अर्ज मंजुरी, त्रुटी किंवा अर्ज नाकारण्यात आल्यास सरळ तालुका प्रशासन पत्राद्वारे लेखी माहिती देत होते मात्र सध्या ही माहिती प्रशासनाकडून संबंधित लाभार्थींना पत्राद्वारे मिळत नसल्याने कांही दलाल लोक त्यांना चुकीची माहिती देऊन व दिशाभूल करून अवाजवी लूट करत आहेत. यासाठी सर्व लाभार्थींना तालुका प्रशासनाने सर्व माहिती लेखी पत्राद्वारेच कळवावी जेणेकडून त्यांची दलालां कडून लूट होणार नाही अशी मागणीही केज विकास संघर्ष समितीने संबंधित विभागाकडे केली आहे.

वरील सर्व मागण्याकरिता केज विकास संघर्ष समितीच्या वतीने येत्या शुक्रवार दि १४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपासून केज तहसील कार्यालयासमोर बेमुदत अमरण उपोषण सुरु करण्यात येणार आहे. केजवासियांनी या उपोषणास आपला पाठिंबा द्यावा असे आवाहनही सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांनी केले आहे. निवेदनावर नासेर मुंडे, शेषराव घोरपडे, इंजि.मोहनराव कराड, नारायण पंढरीनाथ बिक्कड, संपत वाघमारे इत्यादीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

जय बजरंग प्रतिष्ठानच्या जिल्हाध्यक्ष पदी सोपान गोरे यांची निवड

सर्वसामान्य कुटुंबातील मुलाला दिली संधी

पात्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील वाघोरा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा सावता महासंघाचे जिल्हाध्यक्ष सोपान गोरे यांची जय बजरंग प्रतिष्ठानच्या जिल्हाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे या निवडीचे पत्र जालना येथे झालेल्या कार्यक्रमात त्यांना प्रदान करण्यात आले आहे.

सोपान गोरे हे गत अनेक वर्षापासून सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत त्यांनी आतापर्यंत विविध सामाजिक संघटनेच्या पदावर काम केले आहे त्यांच्या या कामाची दखल घेऊन जय बजरंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामप्रसाद मुंदडा यांनी सोपान गोरे यांना बीड जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती दिली आहे. येणाऱ्या काळात जय बजरंग प्रतिष्ठानचे कार्य जिल्ह्यात युवकापर्यंत पोहोचण्याचे काम करावे अशी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. जालना येथे दि. १० ऑगस्ट रोजी झालेल्या कार्यक्रमात सोपान गोरे यांना जिल्हाध्यक्ष पदाचे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले आहे. यावेळी संस्थापक अध्यक्ष रामप्रसाद मुंदडा, सुभाषचंद्र देविदान, अंकुश राऊत, दिगांबर पेरे, मुन्ना गजबी, हिरालाल पिपरिये, पवन जोशी, बबनराव घायाळ, लक्ष्मण नेमाने, निलेश उपाध्याय, सुनील भावसार, संभाजी गोरे, संजय मुंदडा, गोविंद मुंदडा, गोविंद गाजरे सह आदी उपस्थित होते. दरम्यान सोपान गोरे यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

माजलगावमध्ये किरकोळ वादातून महिलेस व मुलास मारहाण

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील हनुमान चौक, तानाजीनगर येथे किरकोळ वादातून महिलेस व तिच्या मुलास मारहाण करून जीवघेणी धमकी दिल्याची घटना घडली. हा प्रकार ९ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता उघडला असून, १० ऑगस्ट रोजी पहाटे १ वाजता पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली.

फिर्यादी किशकिंदा बालासाहेब सोन्नेकर यांच्या मुलाने आरोपी राहुल मस्के यास आमच्या दुकानासमोरील ट्रकचे आरसे व गोंडे काढू नका असे सांगितले. यावरून आरोपीने भैया प्रधान व दोन अनोळखी व्यक्तींना फोनवरून बोलावून घेतले. आरोपींच्या टोळीने फिर्यादीच्या घरी जाऊन तिच्या मुलास मारहाण केली. मारहाणीचा प्रसंग थांबवण्यासाठी फिर्यादी पुढे सरसावली असता आरोपी राहुल मस्के याने तिला कोपराने छातीवर व बेल्टने हातावर मारून दुखापत केली. याच दरम्यान आरोपींनी फिर्यादी व तिच्या मुलास शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी माजलगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास सहायक फौजदार वडमारे करत आहेत.

वराह चोरीच्या वादातून रस्त्यावरच तुफान राडा; दगडफेक, तलवारीच्या हल्ल्यात अनेक जण गंभीर जखमी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

मोरेवाडी शिवारात वराह चोरीच्या कुरापतीवरून सुरू झालेल्या वादातून झालेल्या तलवार आणि दगडफेकीत दोन्ही बाजूंनी गंभीर जखमी होण्याचा प्रकार घडला आहे. या घटनेत परस्परविरोधी तक्रारींवरून दोन्ही गटांतील एकूण आठ जणांवर अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात प्राणघातक हल्ला केल्याचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

घटनेविषयी मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी दिनेश लक्ष्मण जाधव (रा. सदर बाजार, अंबाजोगाई) यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, १० ऑगस्ट रोजी दुपारी अडीच वाजता ते व त्यांचे भाऊ भारत जाधव स्विफ्ट डिझायर गाडीतून भावाच्या जोगाईवाडी शिवारातील घरी जात होते. मोरेवाडीतील लाल सटवा मेंडके यांच्या घरासमोरून जात असताना गाडीच्या मागील काचेला जोरात आवाज आला. गाडी थांबविल्यावर लाला भागवत मेंडके, सुजीत उर्फ सुरज सटवा मेंडके, सटवा भागवत मेंडके आणि पवन मेंडके (सर्व रा. मोरेवाडी, अंबाजोगाई) यांनी घेराव घातला. भीतीपोटी तेथून निघून धउच् कॉलेजसमोर गाडी थांबवल्यानंतर आरोपी पुन्हा दोन दुचाक्यांवर आले. त्यांनी 'जनावरे चोरतोस का?' असा सवाल करत तलवारीने भारत जाधव यांच्या डोक्यात वार केला. बचाव करताना दिनेश जाधव यांच्या तळहातावर गंभीर जखम झाली. त्यानंतर दगडफेक करून भावंडांसह युवराज मेंडके, हेमंत जिरंगे यांनाही मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. सदर फिर्यादीवरून लाला मेंडके, सुजीत मेंडके, सटवा मेंडके आणि पवन मेंडके यांच्याविरुद्ध प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला.

त्यानंतर तो, त्याचा भाऊ सटवा व पुतण्या सुरज पोलिस स्टेशनकडे तक्रार करण्यासाठी निघाले असता, धउच् कॉलेजजवळ भारत लक्ष्मण जाधव, दिनेश लक्ष्मण जाधव, युवराज बाबुराव गायकवाड व हेमंत धिरंगे (सर्व रा. सदर बाजार, अंबाजोगाई) हे तलवार व लोखंडी रॉड घेऊन आले. त्यांनी सटवा मेंडके यांच्या हातावर, दिनेश यांनी छातीवर, तर युवराज यांनी गळ्यावर तलवारीने वार करून जखमी केले.

सुरज मेंडके यांच्यावरही तलवारीने हल्ला झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. या तक्रारीच्या आधारे चारही आरोपींवर प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, या घटनेत दोन्ही बाजूंतील अनेक जण जखमी झाले असून, तलवार आणि दगडफेकीत गाडीचेही नुकसान झाले आहे. अंबाजोगाई शहर पोलीस पुढील तपास करत आहेत.

भक्तांची मनोकामना पूर्ण करणारे ऐतिहासिक जागृत देवस्थान श्री.पंचलिंगेश्वर महादेव मंदिर संस्थान गंगावाडी

धार्मिक श्रावण सोमवार विशेष

मराठवाड्यातील बीड- जालना जिल्ह्याच्या सीमेवरील बिड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील दक्षिणमुखी गोदावरी नदीच्या तीरावर असलेल्या गंगावाडी येथील जागृत देवस्थान श्री पंचलिंगेश्वर महादेव मंदिर संस्थान आहे. हे संस्थान मराठवाड्यात सर्व परिचित असुन नवसाला पावणारे व भाविक भक्तांची मनोकामना पर्ण करणारे संस्थान म्हणून देखील ओळखले जाते. या ठिकाणी दरवर्षीच बारा महिने व महाशिवरात्रीला तसेच श्रावण महिन्यात दररोज विशेषतः श्रावण सोमवारी दिवसभर बिड, जालना, छत्रपती संभाजीनगर, परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यातील भाविक भक्तगण मनोभावे दर्शनासाठी व बोललेला नवस फेडण्यासाठी येतात. या श्री.पंचलिंगेश्वर महादेव मंदिर संस्थान वर भाविकांची पुर्णपणे श्रध्दा आहे. हे नवसाला पावणार जागृत देवस्थान म्हणून सर्वपरिचित असुन संस्थान आज कालचे नसुन पुरातन काळापासून आहे असे जुने जाणते वृद्ध नागरिक सांगतात. या मंदिराचे बांधकाम लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या काळात झालेले होते परंतु ते बांधकाम जिर्ण झाल्याने व मोडकळीस आल्याने गांवातील लोकांनी पाडून नवीन बांधकाम करून जिर्णोद्धार केला आहे. आज मितिला

श्री. पंचलिंगेश्वर महादेवाचे शानदार असे भव्य - दिव्य मंदिर, समोरील ऋषीमुनींच्या पुरातन समाधी, नंदी असुन गांवात येणाऱ्या भाविकांचे व पाहुण्या रावळ्यांचे लक्ष वेधून घेते. या मंदिर बांकामाने व समोरील सभामंडाने गांवच्या वैभवात आणखीनच घातली आहे. भाविक भक्तांच्या सोयीसाठी सभामंडपाच्या खालील भागत ग्राउंड लेवलला भक्त निवासाची देखील व्यवस्था केलेली आहे. हे मंदिर विकासाचे सर्व काम गांवक-यांच्या भक्त गणाच्या लोकसहभागातून झालेली आहेत. यासाठी संस्थानच्या विकासासाठी श्री. पंचलिंगेश्वर तरूण मंडळ सदैव कार्यरत असते. आज पर्यंत या संस्थानला शासनाचा व लोकप्रतिनिधीचा एक रूपया देखील मिळालेला नाही. या ठिकाणी महाशिवरात्री निमित्त पंचदिनी शिवनाम पंचलिंगेश्वर कितर्न महोत्सव राबविण्यात येतो. तसेच त्या काळात गांवातील श्री. पंचलिंगेश्वर करून मंडळाच्या वतीने योग शिबिर, रक्तदान शिबीर सह विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन आयोजन आवर्जून केले जाते. या पंचलिंगेश्वर महादेव मंदिर संस्थान लगत गोदावरी नदी दक्षिणमुखी वाहत आहे. या संस्थानचा इंद्रतिर्थ म्हणून देखील उल्लेख गोदा महात्मे या ग्रंथात असल्याचा दावा गोदावरी परिक्रमा करणारे साधूसंतानी केला आहे. गोदावरी परिक्ररा करतांना जांबसमर्थ येथील संत रामदास स्वामी यांनी या संस्थानलाभेट दिल्याचे देखील असल्याची माहिती गांवातील जुनी जाणती मंडळी सांगतात तलवाडा पंचक्रोशीतील भाविक भक्तगण सणा सुदीला, एकादशीला तसेच सोमवारी गंगेस्नानासाठी गंगावाडीत येतात गंगेस्नान झाल्यानंतर प्रथम श्री. पंचलिंगेश्वर महादेवाचे दर्शन घेतात. या परिसरात निसर्गरम्य वातावरणात असुन समोरील वडाचे झाड सर्वांचे लक्ष वेधून घेते अन् उन्हाळ्यात सावलीसाठी देखील उपयोगी ठरते. याच ठिकाणी तालुक्यातील अनेक गांवातील लोक दशक्रिया विधी करीता येतात त्यामुळे उन्हाळ्यात सावलीसाठी व पावसाळ्यात निवा-यासाठी या संस्थान समोरील सभामंडपाचा व परिसरातील वृक्षाचा आधार घेतात. येथील वातावरण श्रावण महिन्यात थंडगार हिरवेगार असते. गांवकरी मनमोकळेपणाने गप्पा गोष्टी करण्यासाठी या परिसरात येत असतात. जवळच हाकेच्या अंतरावर जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा असल्याने पशुपक्ष्यांच्या आवाजासम विद्यार्थींचा किलबिलाट ऐकू येतो. त्यामुळे तेथील वातावरण अधिकच प्रसन्नमय वाटते. महाशिवरात्रील तसेच श्रावण महिन्यात दर्शनासाठी भाविकांची गर्दी देखील मोठ्या प्रमाणात असते.

श्रावण सोमवार विशेष

ओमराजे कांबीलकर

भ्रमणध्वनी - ८८८८५२२२८२

गंगावाडी, ता.गेवराई, जि.बीड

परळी शहराची आन, बान, शान असलेला जातीपाती पेक्षा मानवतावाद निर्माण करण्याचे काम करणारे बाजीराव धर्माधिकारी भैया

परळी शहर व तालुका ही नररत्न निर्माण करणारी खान आहे परळी शहराने संपूर्ण जगाला अनेक नरतने दिलेली आहेत परळी शहराचा व परिसराचा नावालौकिककरण्याचं काम अनेक लोकांनी निर्माण केलेला आहे. परळी सारख्या छोट्या शहराचं नाव संपूर्ण जगाच्या नकाशावर पोहोचण्याचा काम करणारे अनेक लोक यापूर्वी शहरांमध्ये निर्माण झालेली आहे परळी शहराची व परिसराची काही प्रमाणात बदनामी होत चाललेली आहे जगातला असं कोणतंच गाव नाही त्या ठिकाणी गुंडागर्दी दादा गर्दी खून दरोडे राजकीय लोकांचे अत्याचार होत नाहीत असं कोणतच गाव नाही परंतु परळी शहराला जास्त बदनाम करण्याचं काम केलेलं आहे येथील अनेक लोकांनी आपल्या स्वतःच्या कर्तुत्वावर जगाला मुठीत घेण्याचं काम केलेलं आहे या परळी शहरातील अनेक लोकांनी स्वतःच्या कष्टावर जिद्दीवर परिश्रमावर मेहनतीवर स्वतःच्या नावाचा डंका वाजवण्याचे काम केलेला आहे अनेक लोकांनी जातीपातीच्या भिंती तोडून त्यांचा ऱ्हास करून त्यांना कायमचं मुठमाती देऊन मानवी मूल्यांची जपणूक करून मानवतावाद निर्माण करण्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची घालण्याचे काम केलेले आहे.

अनेक वर्षापासून परळी शहरांमध्ये अनेक वर्षापासून अत्यंत गर्भ श्रीमंत असून देखील असंख्य गोरगरिबांना त्यांच्याअडीअडचणीच्या काळात संकटाच्या काळात व त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न करणारे अनेक गोरगरिबांच्या जीवनामध्ये अंधाकार नष्ट करून त्यांचे प्रकाश मय जीवन करण्यासाठी प्रयत्न करणारे अनेक गुरुगरिबांना राहण्याची व्यवस्था करणारे त्यांना मानवी सुविधा पुरवून त्यांच्या जीवनाला आनंददायी आनंदमय करण्याचं काम करणारे व त्यांच्या जीवनाला कलाटणी देण्याचे काम करणारे दानशूर व्यक्तिमत्व असलेले आदरणीय माणिक बाजीरावधर्माधिकारी यांच्या वैचारिक धार्मिक व सांस्कृतिक वारसा पुढे चालवण्याचं काम करणारे परळी परिसरामध्ये प्रत्येक जाती धर्माच्या सुखदुःखाला संकट समयी धावत पळतजाऊन त्यांच्या समस्याचे निरसन करणारे दिवस असो रात्र असो प्रत्येक माणसाच्या अडचणीच्या काळामध्ये ढालीसारखं उभ राहण्याचं काम करणारे आपल्या स्वतःच्या कर्तुत्वावर संपूर्ण महाराष्ट्रभर देशभर आपल्या कर्तृत्वाचा आम्ही ठसा उमटवण्याचं काम करणारे मराठवाड्यातील सर्वात युवा नगराध्यक्ष होण्याचा पहिला मान मिळवणारे सामाजिक परिवर्तनाच्या लढाईमध्ये परळी तालुक्यातील सर्वात अग्रेसर नाव असणारे अत्यंत शांत संयमी स्वभावाचे असणारे प्रत्येक माणसाला हस्तेवायकपणे विचारपूस करणारे भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हा मंत्र सांगणारे कोणताही माणूस त्यांच्याकडे जाऊ त्या माणसाचं काम होऊ अथवा नाही पण त्या माणसाला असतेवायकपणे विचारपूस करून त्या माणसाच्या कामासाठी प्रयत्न करणारे मोठेपणाचा आवरण आणता सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नासाठी सदैव लढत राहण्याचे काम करणारे गोरगरीब माणसाच्या प्रश्नासाठी रस्त्यावर सदैव उतरण्याचं काम करणारे जातीपातीच्या धर्माच्या भिंती चोरून त्या ठिकाणी मानव धर्म निर्माण करण्यासाठी हाडाची कार्य करणारा मानवतेच तत्त्वज्ञान घराघरांमध्ये फिरण्याचे काम करणारा परळी शहरांमध्ये सामाजिक सांस्कृतिक आर्थिक व राजकीय क्षेत्रामध्ये स्वतःच्या कर्तृत्वाने स्वतःचं फार मोठं नाव निर्माण करून समाज परिवर्तनाच्या लढाईमध्ये मानवी विचाराची पताका हाती घेऊन मानव धर्म निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असलेला परळी शहरामध्ये सामाजिक परिवर्तनासाठी गोरगरीब माणसाच्या अन्यायव अत्याचारा विरुद्ध लढा देण्याचे काम करणारा स्वातंत्र्यवीर सावरकर या पतसंस्थेच्या माध्यमातून अनेक गोरगरीब सामान्य माणसांच्या जीवनामध्ये क्रांती घडवण्याचं काम करणारा अनेक गोरगरीब माणसांना छोट्या छोट्या उद्योगासाठी त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना कर्ज देऊन या समाजामध्ये ताठ मानेने जगता यावे म्हणून त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी सहकार्य

करण्याचे काम करणारा अनेक गोरगरीब लोकांच्या लेकींच्या लग्नासाठी आर्थिक मदत करण्याचे काम करणारा अनेक अपंग माणसांना या समाजामध्ये जगता यावे यासाठी त्यांना वेळोवेळी मदत करण्याचे काम करणारा जे काही रंजले गांजले लोक आहेत. त्या लोकांच्या सुखदुःखात सक्रिय सहभागी होण्याचे काम करणारा परळी शहरांमध्ये सामाजिक सांस्कृतिक राजकीय क्षेत्रामध्ये जे काही सामाजिक दृष्टिकोनातून उपयुक्त असे कार्यक्रम आहेत ते कार्यक्रम राबवण्याचे काम करणारा रक्तदान शिबिरे लोक महोत्सव विद्यार्थ्यांच्या अनेक शैक्षणिक दिंड्या गोरगरीब लोकांच्या लेकरांना शिक्षणासाठी सदैव सढळ हाताने मदत करण्याचे काम करणारा परळी शहरांमध्ये आदरणीय धनंजय मुंडे यांच्या कल्पक बुद्धीतून अनेक सामाजिक उपक्रम राबवले जातात त्या उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे काम करणारा गणेशोत्सव असो भीम उत्सव असो या उत्सवाच्या माध्यमातून परळीकरांना आंतरराष्ट्रीय खेतीचे कलाकार आणून त्यांचे मनोरंजन करण्याचे काम करणारा भीम उत्सवामध्ये परळी शहरात अनेक वर्षापासून महाराष्ट्रातील अनेक समाज परिवर्तन करणाऱ्या गायकांना बोलवून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचाराची पेरवणूक करण्याचे काम करणारा परळी परिसरामध्ये सामाजिक प्रश्नाचे भान ठेवून समाजाच्या हितासाठी सदैव लढण्याचे काम करणारा राजकीय क्षेत्रामध्ये सक्रिय सहभागी असून सुद्धा सामाजिक परिवर्तनाच्या लढाईमध्ये स्वतःला झुकून देऊन या समाजाच्या हितासाठी सदैव रडण्याचे काम करणारा प्रचंड पैसा असतांना देखील ऐश्वर्य संपन्न असताना देखील समाजासाठी आपण काहीतरी केलं पाहिजे समाज हा पुढे गेला पाहिजे या विचाराने प्रेरित होऊन प्रत्येक समाजाच्या कार्यामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे काम करणारा ब्राह्मण सभेच्या माध्यमातून अनेक समाज परिवर्तनाची कार्यक्रम घेऊन या समाजामध्ये परिवर्तन निर्माण करण्याचे काम करणारा अनेक व्यक्तींनी घेऊन या समाजामध्ये शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचे काम करणारा अनेक वर्षापासून आषाढी एकादस असो हिंदू धर्माचे कोणतेही सण असो मुस्लिम समाजाचे कोणतेही विश्वास नसेल प्रत्येक कार्यक्रमाला आवर्जून उपस्थिती राहो त्या कार्यक्रमाला यशस्वी करण्याचे काम करणारा प्रत्येक जाती-धर्माच्या सणासुदीच्या काळामध्ये अनेक गोरगरीब कुटुंब यांना मदत करण्याचे काम करणारा मुस्लिम समाजाच्या सर्वात मोठे असणाऱ्या रमजान ईद मध्ये अनेक गोरगरीब माणसांना मदत करण्याचे काम करणारा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती असे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती असो दुर्गा महोत्सव सावित्रीबाई फुले जयंती असो महाराष्ट्रातील किंवा भारतातील कोणत्याही महापुरुषांची जयंती असो या कार्यक्रमासाठी सरळ हाताने मदत करून त्या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेण्याचे काम करणारा आपल्या मेहनतीच्या जोरावर परळी शहराचा नगराध्यक्ष परळी शहराचा काया पार करण्याचं काम करणारा अनेक लोकांना आवश्यक असलेले घरकुले मंजूर करून त्यांच्या घराचा प्रश्न सोडवण्याचे काम करणारे परळी शहरातील अनेक सांस्कृतिक सभागृह न नवीननाल्या पथदिवे लावण्याचे काम करणारा परळी शहरातील अनेक समस्या सोडवण्याचे काम करणारा परळी शहराला एक विकसित शहर म्हणून पुढे आणण्यासाठी सदैव प्रयत्न करण्याचं काम करणारा आपल्या नगराध्यक्ष च्या काळामध्ये त्यांनी अनेक योजना राबवून परळी शहरांमध्ये आपल्या कार्याचा ठसा उमटवण्याचा काम केलेला आहे आजही नगरसेवक या पदावर कार्यरत असताना आपल्या भागातील सर्वसामान्य माणसाच्या जीवनामध्ये क्रांती घडली पाहिजे म्हणून प्रयत्नशील असलेला आपल्या वर्गातील संपूर्ण मूलभूत समस्या सोडवण्यासाठी सदैव प्रयत्नशील असलेला आपला वाढ हा प्रगतमय असला पाहिजे म्हणून सर्व सुख सुविधा उपलब्ध करण्यासाठी सदैव कार्यरत असणारा आपल्या आजोबाच्या नावे रुग्णवाहिका लोक अर्पण करून या रुग्णवाहिकेच्या माध्यमातून अनेक गोरगरीब माणसांची जीवन वाचवण्याचे काम करणारा अत्यंत अल्प दरामध्ये सदरची रोग आहे का २४ तास लोकांच्या दारी उभे करण्यास महत्त्वाचं काम करणारा अनेक सामाजिक उपक्रम राबवून या समाजासाठी समाजाच्या परिवर्तनासाठी सक्रिय असलेल्या सामाजिक भान ठेवून या समाज परिवर्तनाच्या लढाईमध्ये सर्वांच्या पुढे असणारा एक क्रियाशील युवा नेतृत्व म्हणजेच आदरणीय बाजीराव भैया धर्माधिकारी आपल्या कार्याच्या जोरावर अनेक पुरस्कार मिळवण्याचा काम करणारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील दिग्गज वाक्यातनम लोकांना दिले जाणारे पुरस्कार आदरणीय बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांना त्यांच्या कर्तृत्वामुळे मिळालेले आहेत अत्यंत साधा व सरळ स्वभावाचा असलेला परंतु मानवी जीवनात क्रांतिकारी बदल घडवण्यासाठी पुढाकार घेण्याचं काम करणारा गोरगरीब सामान्य माणसाचा रखवाला अनेक लोकांच्या जीवनामध्ये क्रांतिकारी परिवर्तन करण्याचे काम करणारा अनेक लोकांना मरणाच्या दाढीतूनमुक्त करण्याचं काम करणारा अनेक गोरगरीब माणसाच्या घराला घरपण आणण्याचं काम करणारा परळी परिसरातील अनेक गोरगरिबांच्या गळ्यातील ताईत असलेला गोरगरिबांची अशा स्थान प्रेरणास्थान असलेला युवकांना प्रेरणास्थान असलेला जीवनात माणसाने काम करावे या मताचा असलेला गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या सुखदुःखामध्ये अत्यंत नानाने सक्रिय सहभाग घेणारा अनेक लोकांच्या बरबाद झालेल्या संसाराला उभे करण्याचे काम करणारा गोरगरीब सामान्य माणसाचे आशीर्वाद घेऊन त्यांचे जीवन सुखमय व्हावे यासाठी सदैव प्रयत्नशील असलेला सामाजिक न्यायाच्या भूमिका स्वातंत्र्य समता बंधुत्व या तत्त्वाची पाठ राखण करण्याचे काम करणारा भारतीय संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक माणसाने पुढे आले पाहिजे जात धर्मभेद यांच्या पुढे जाऊन मानवी मूल्यांची जपणूक केली पाहिजे या जीवनामध्ये प्रत्येक माणसाने स्वाभिमानाने जगून या पृथ्वीतलावर आपलं स्वतःचं अस्तित्व निर्माण केलं पाहिजे या मताचा असलेला राजकारणापेक्षा समाजकारणाकडे लक्ष देण्याचे काम केले पाहिजे दिल्या.

प्रत्येक विद्यार्थ्यांनी शिक्षणाची कास धरून शिक्षणाच्या माध्यमातून मोठा होण्याचं काम केलं पाहिजे येथील युवा पिढीने बलवान झालं पाहिजे व्यायाम करून देश सेवेच्या रक्षणासाठी पुढे आलं पाहिजे व्यसनापासून मुक्त झालं पाहिजे आपले आई-वडिलांचे नाव भूषण करण्यासाठी प्रत्येक माणसाने परिश्रम केले पाहिजे या जगामध्ये आपल्या स्वतःच्या कर्तुत्वाचा डंका प्रत्येक माणसाने निर्माण केला पाहिजे लोकांची लाचारी करण्यापेक्षा स्वतःच्या पायावर उभे राहून आपल्या आई-वडिलांचे नाव रोशन करण्याचं काम केलं पाहिजे या मताचा असलेला परळी शहराची आन-बान शान असलेला जातीपाती पेक्षा मानवतावाद निर्माण करण्याचं काम करणारा आदरणीय बाजीराव धर्माधिकारी भैया यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त कोटी कोटी हार्दिक शुभेच्छा जय भीम जय प्रबुद्ध भारत.

ॲड. उजगरे

दास्य भक्तीचा सर्वोच्च आदर्श हनुमंतराव : रोहिणीताई परांजपे

डॉ. सुदाम महाराज पानेगावकर, डॉ. नाना महाराज कदम समाजभूषण, अध्यात्म भूषण पुरस्काराचे सन्मानित

बीड । प्रतिनिधी

देवाच्या दारात जाण्यासाठी सेवा दारवांटा आहे. दास्य भक्तीचा सर्वोच्च आदर्श रामायणात हनुमंतराय आहेत, अशा प्रतिपादन ह.भ.प. रोहिणी परांजपे यांनी केले. धारूर तालुक्यातील चारदरी येथील जागरण हनुमान मंदिर या ठिकाणी तिसऱ्या श्रावण शनिवारी आयोजित कीर्तन सोहळा त्या बोलत होत्या. यावेळी प्रमुख उपस्थिती ह.भ.प.डॉ. सुदाम महाराज पानेगावकर, ह.भ.प.डॉ. नाना महाराज कदम, ह.भ.प. विठ्ठल महाराज आंधळे शास्त्री, ह.भ.प. सुरेश महाराज जाधव, ह.भ.प. बाबा महाराज मुंडे, शिवाजी तोंडे यांच्या सह हजारो भावी भक्तांची उपस्थिती होती.

धारूर तालुक्यातील श्रीक्षेत्र चारदरी येथे जागृत हनुमान मंदिरात दुसऱ्या श्रावण शनिवारी गेल्या १९ वर्षापासून तोंडे कुटुंब ज्ञानदान व अन्नदानाचे सेवा करत आहे. यावर्षी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार कीर्तन चंद्रिका सुनीताई परांजपे यांचे कीर्तन संपन्न झाले. यावेळी त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या

तुझी सेवा करीन मी मनोभावें वो ।
माझें मन गोविंदीं रंगलें वो ।।१।।
नवसिये नवसिये माझे नवसीयेवो ।।
पंढरिचे दैवते विठ्ठले नवसिये वो ।।२।।
बापरखुमादेवीवरे विठ्ठले वो ।
चित्तीं चैतन्य चोरुनि नेलें वो ।।३।।

या अभंगावर सुंदरचिंतन मांडले. यावेळी बोलताना रोहिणी ताई यांनी देवाच्या दारात जाण्यासाठी सेवा दारवांटा त्यामुळे सेवा करणं महत्त्वाचं चार्जर येथील हनुमान मंदिराची सेवा केली तर त्याचे फळ मिळतेच. सामान्य जीव देवाकडे सर्व गोष्टी मागतात मात्र देवाकडे देव मागत नाही. संत हे देवाकडे देवालाच मागतात. अध्यात्म कीर्तन वारकरी परंपरा यात वारकरी संतांनी समतेची दृष्टी दिली. संत ज्ञानेश्वर महाराजांनी भावार्थदीपिका ही गीतेवरील टीका केली. भाव हा भक्तीचा अलंकार आहे. माणसाचा देव झाला पाहिजे. यासाठी अध्यात्म आहे. संताना अपेक्षित समाज घडण महत्वाच आहेत, असे चिंतन रोहिणी ताई यांनी मांडले.

कीर्तनानंतर सामाजिक क्षेत्रात काम करणारे डॉक्टर सुदाम महाराज पानेगावकर यांना समाजभूषण म्हणून गौरविण्यात आले तर लिहावा प्रा.डॉ. नाना महाराज कदम यांना अध्यात्म भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कीर्तनानंतर उपस्थित हजारो जनसमुदायाला बुंदी, चपाती, भात भाजी, अशा महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी मंदिर परिसरात मोठ्या पंक्ती बसल्या होत्या हजारोच्या पंखेला वाढण्याचे काम चार्जर येतील तरुण मंडळांनी केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन शिवाजी तोंडे यांचे दोन्ही मुल भारत तोंडे आणि मोहन तोंडे यांनी केले होते.

चारदरी ते जागृत हनुमान मंदिर भक्ताच्या भावनेला फळ देणारी आहे. त्यामुळे जीवन आनंदाने जगा एकमेकांचा द्वेष मत्सर करणं सोडून द्या. सर्व जाती धर्माच्या लोकांनी एकोप्याने आनंदाने जगा हाच संत भगवान बाबांचा संदेश आहे. तोंडे कुटुंबाने १९ वर्ष निस्वार्थपणे समाज एकत्रित करण्याचे काम करत आहे. त्यांचा आदर्श इतरांनी घ्यावा.

– प्रा.डॉ. नाना महाराज कदम नेकनुरकर

आम्ही ज्ञानोबा तुकोबाचे आहोत..

राजकारण स्वार्थी आहे.अध्यात्म एकत्रित करणारे आहे. आम्ही एका जातीचे समाजाचे नाही तर आम्ही ज्ञानोबा तुकोबाचे आहोत. या जाती पाती बाजूला सारून एकत्रित या. सामाजिक सौख्य बिघडू देऊ नका. माणसामधील जिव्हाळा कमी होऊ देऊ नका. बिघडलेला सामाजिक स्वास्थ अध्यात्मक सुधारू शकते त्यामुळे अध्यात्माची कास सोडू नका.

– डॉ.सुदाम महाराज पानेगावकर

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या सुवर्ण कलशारोहणासाठी राहुल चव्हाण यांच्याकडून ०१ लाख ११ हजार देणगी

केज । प्रतिनिधी

दातृत्व कर्तृत्व आणि नेतृत्व यांचा त्रिवेणी संगम म्हणजे राहुल ज्ञानेश्वर चव्हाण असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही, इवलेसे रोप लाविलेये द्वारी, त्याचा वेणू चालला गगनावरी दहा वर्षां पासून राहुल ज्ञानेश्वर चव्हाण हे समाजातील विविध क्षेत्रात दातृत्वाचे काम करताना दिसत आहेत. आज संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५०व्या जयंती महोत्सवाच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीने माऊलींच्या संजीवन समाधी मंदिराच्या शिखरावर ११ किलो सुवर्णाचे कलशारोहण करण्याचा संकल्प सोडला आहे. हा महोत्सव गोकुळअष्टमी, दि.१५ ऑगस्ट २०२५ रोजी साजरा होणार आहे. या मंगलकार्यासाठी सर्व भाविक, भक्त आणि वारकऱ्यांना स्वेच्छेने आर्थिक देणगी किंवा वस्तुरूपी सुवर्ण दान देण्याचे आवाहन संस्थान कमिटीने केले आहे.

या आवाहनाला प्रतिसाद देत आळंदी शिवसेना शहर प्रमुख राहुल ज्ञानेश्वर चव्हाण यांनी उदारअंतःकरणाने देणगी अर्पण केली आहे. राहुल ज्ञानेश्वर चव्हाण यांनी आपले आजोबा कै.भिकू मारुती चव्हाण आणि आजी कै.शांताबाई भिकू चव्हाण यांच्या स्मरणार्थ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या सुवर्ण कलशारोहण कार्यासाठी १,११,१११ रुपये इतकी देणगी माऊलींच्या चरणी अर्पण केली आहे. या दानशूर योगदानाबद्दल श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीने राहुल चव्हाण यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे.

नवनिर्वाचित प्रगतशील शेतकरी नंदराज देशमुख यांनी नवीन ड्रोन यंत्राने केली फवारणी!

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील नवनिर्वाचित शेतकरी प्रगतशील शेतकरी नंदराज अनिलराव देशमुख यांनी बदलत्या काळानुसार नवीन शेतकरी व नवीन यंत्राच्या सहाय्याने फवारणी करण्यासाठी चिंचोली माळी येथील अनिलराव देशमुख यांचे चिरंजीव नंदराज देशमुख यांनी ड्रोनच्या सह्याने प्रत्येक्षात फवारणी केली आहे. ड्रोनफवारणी यंत्र म्हणजे शेतात कीटकनाशके, खते किंवा बियाणे फवारण्यासाठी वापरले जाणारे मानवरहित विमान. हे ड्रोन रिमोट कंट्रोलने चालवले जातात. त्यात विशिष्ट प्रमाणात औषध किंवा खत भरण्याची क्षमता असते. ड्रोन फवारणी यंत्राचे फायदे वेळेची बचत ड्रोनने फवारणी केल्यास कमी वेळेत जास्त क्षेत्रफळावर फवारणी करता येते, ज्यामुळे वेळेची बचत होते. तसेच खर्चात बचत होते, पारंपरिक पद्धतीने फवारणी करताना मनुष्यबळ जास्त लागते, तर ड्रोनने फवारणी केल्यास मनुष्यबळाचा खर्च वाचतो. सुरक्षितता शेतात काम करणाऱ्या व्यक्तींना विषारी रसायनांचा धोका कमी होतो. अचूक फवारणी ड्रोन पिकांच्या उंचीनुसार आणि गरजेनुसार अचूक फवारणी करू शकतात, ज्यामुळे खतांचा आणि कीटकनाशकांचा अपव्यय टाळता येतो. दुर्गम भागात फवारणी ड्रोन उंच ठिकाणी किंवा दुर्गम भागात सहजपणे फवारणी करू शकतात, जिथे मनुष्य जाऊन फवारणी करणे शक्य नसते. भारतातील कृषी ड्रोनची किंमत भारतात, फवारणी करणारे ड्रोन १.५ लाख ते ७ लाख रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत, तर मल्टीस्पेक्ट्रल मॅपिंग ड्रोन ८ लाख ते १२ लाख रुपयांपर्यंत असू शकतात. शेवटी, ड्रोन फवारणी यंत्र हे आधुनिक शेतीसाठी एक उपयुक्त तंत्रज्ञान आहे. ज्यामध्ये वेळेची बचत, खर्चात बचत आणि अचूक फवारणी यासारखे फायदे आहेत, पण याची प्रारंभिक किंमत आणि बॅटरीची मर्यादा विचारात घेणे आवश्यक आहे. असे आव्हान नंदराज देशमुख व वडील अनिलराव देशमुख यांनी म्हटले आहे.

साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त बिसेफच्या माध्यमातून परिसंवाद व राज्य कार्यकारिणीची बैठक संपन्न

बीड । प्रतिनिधी

सत्यशोधक साहित्य सम्राट डॉ. अण्णा भाऊसाठे यांची जयंती केज येथे मोठ्या उत्सवात साजरी करण्यात आली. यावेळी भारतीय धम्म महासंघाच्या वतीने प्रथम सर्व महापुरुष यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास आलेल्या सर्वच मान्यवरांचे स्वागत शाल हार व पुष्प गुच्छ देऊन करण्यात आले. बौद्ध धम्माच्या नियमानुसार कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदना घेऊन करण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञाचे यावेळी वाचन करण्यात आले तसेच भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. त्यानंतर मंगल मैत्री गीत झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मंगलम यांनी भूषविले. एच.पी. कांबळे साहेबांनी प्रमुख मार्गदर्शकाची भूमिका निभावली त्याचप्रमाणे दीपक साठे, दत्ताजी माने, एस.एम. जोगदंड, कोळंबीकर व प्रा. रामराव वाघमारे यांनी यावेळी मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी मनोगत व्यक्त करताना श्रमिक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष लक्षण वाघमारे यांनी अशा कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजप्रबोधन कशा पद्धतीने होत आहे याविषयी मार्गदर्शन केले. त्याच प्रमाणे इतर सर्वच मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले. शेवटी शरण्यागत घेउन कार्यक्रमातील सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपला असे जाहीर करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल वैरागी सर यांनी केले.

प्रास्ताविक मदन जोगदंड सरांनी केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अनिल चौरे साहेबांनी व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाला ॲड.दीपक साठे लातूर, प्रा.रामराव वागमारे नांदेड, एस.एम. जोगदंड, प्रा.जी.एल. सूर्यवंशी, बाळासाहेब जाधव बीड, दत्ताजी माने लातूर, भारत सूर्यवंशी, पी.बी. कोलंबीकार, समर्थ रोडे, भगवान पाथरीकर, लक्ष्मण वाघमारे, ॲड.चंदवधन जाधव, धर्मराज मुजमुले, भिवाजी जोगदंड, बाबुराव गालफाडे, सुनील वैरागे, अनिल जाधव, संजय कांबळे, सतीश कापसे, सुरेश कांबळेसह समाज बांधव बौध्द उपासक मोठया संख्येने उपस्थित होते.

पाडळी उच्च माध्यमिक विद्यालयात रक्षाबंधन व क्रांती दिन साजरा

शिरूर कासार । प्रतिनिधी

आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित पाडळी उच्च माध्यमिक विद्यालय पाडळी तालुका शिरूर कासार येथे ९ रोजी हिंदू संस्कृतीमध्ये बहिण भावाचे अतूट नाते असणारा रक्षाबंधन सण व क्रांती दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम शाळा महाविद्यालयातील मुलांना मुलींनी राख्या बांधून औक्षण करून बहीण भावाचे नाते जोपासले तसेच शिक्षक वृद्धांना मुलींनी राख्या बांधून रक्षाबंधन सण साजरा केला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य अंगदराव दहिफळे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उच्च माध्यमिक पर्यवेक्षक भाऊसाहेब सोळंगे माध्यमिक पर्यवेक्षक दीपक रत्नपारखी जेष्ठ शिक्षक रामराव देशपांडे रमेश घोडके यांची उपस्थिती होती. कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य दहिफळे यांनी रक्षाबंधनाचे महत्त्व सांगून शाळा व महाविद्यालयातील मुलामुलींनी बहीण-भावासारखे नाते जपून शिक्षण घ्यावे गुणवान कीर्तीवाण बनावे असे त्यांनी बोलताना सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मारुती धांडे यांनी केले. सूत्रसंचलन रजनी इंगोले यांनी केले तर आभार महेश उगलमुगले यांनी मानले. या कार्यक्रमास सर्व कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुंबई येथे होत असलेल्या कार्यकर्ता मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : विनोद थोरात

बीड । प्रतिनिधी

लहुजी शक्ति सेना प्रमुख विष्णुभाऊ कसबे यांच्या नेतृत्वाखाली तथा महाराष्ट्राती प्रमुख पदाधिकारी यांच्या उपस्थितिमध्ये दिनांक १६/०८/२०२५ शनिवार रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह मुंबई येथे मातंग समाज कार्यकर्ता संवाद मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

मराठवाड़ा विभाग मधून व बिड जिल्ह्यामधून जास्तीत जास्त तरुण युवक कार्येकर्ते विष्णुभाऊ कसबे यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या मातंग समाज कार्यकर्ता संवाद मेळाव्यास उपस्थित राहतील असे आवाहन लहुजी शक्ति सेना मराठवाड़ा युवक संघटक विनोदभाऊ थोरात यांनी केले आहे. तरी मराठवाड़ा विभागातुन मेळाव्यासाठी निघत असलेल्या कार्यकर्त्याला कसलीही अडचण आल्यास विनोद भाऊ थोरात लहुजी शक्ति सेना मराठवाड़ा युवक संघटक यांचा मोबाइल नंबर ९५७९७८९९६०/८८८८७५९२४३ हा असून या नंबर संपर्क करावे हि विनती तरी मातंग समाज कार्यकर्ता मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे हि विनती केली आहे.

एकलव्य संघटनेच्या जिल्हाध्यक्षांकडून नवसपुर्ती

आ.धस विधानसभा निवडणुकीत निवडून यावे म्हणून केला होता नवस!

दौलावडगाव । प्रतिनिधी

सर्व सामान्य, कष्टकरी, गोरगरीब, शोषित, वंचित, भटक्या समाजातील लोकांचे प्रश्न पोटतिडीकीने सोडवणारे लोकनेते सुरेश धस आमदार व्हावेत म्हणून विधानसभा निवडणुकीत चैतन्यस्वामी महाराज देवळाली येथे ११ किलो पेढे वाटण्याचा नवस केला होता. आदिवासी क्रांती दिनाच्या व एकलव्य जयंतीच्या निमित्ताने एकलव्य संघटनेचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब पिंपळे यांनी पेढे वाटून नवसपुर्ती केली. आष्टी विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीत सुरेश धस निवडून यावेत. म्हणून एकलव्य संघटनेचे जिल्हाध्यक्ष रावसाहेब पिंपळे हे देवळाली पानाची ता.आष्टी येथील प.पु.श्री. चैतन्यानंद महाराज यांच्याकडे ११ किलो पेढे वाटप करण्याचा नवस बोलले होते. शनिवारी आदिवासी क्रांती दिनानिमित्त व एकलव्य जयंतीच्या निमित्ताने मान्यवरांच्या उपस्थितीत पेढे वाटून नवसपुर्ती केली.

यावेळी पिंपरी गावचे सरपंच मोहन आमटे, घाटा गावचे सरपंच प्रल्हाद मुळीक, जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय उपाध्यक्षा सौ.शिवमती सुवर्णाताई गिऱ्हे, देवळालीचे सरपंच पोपट शेकडे, माजी सरपंच अशोक वायभासे, ग्रामपंचायत सदस्य दादा वायभासे, विकास आमटे, डॉ.बाळासाहेब गिर्हे, युवानेते विलास शिरसाठ, उमेश तांदळे, रावसाहेब पिंपळे, एकता परिषदेचे जिल्हाध्यक्ष राजू माळी, हौसराव पिंपळे, भास्कर पिंपळे, गोकुळ पिंपळे, विजू माळी, गणेश माळी, महादेव माळी याच्यासह मान्यवर उपस्थित होते.

पंचशील ध्वज : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती : बीड

१ ऑगस्ट २०२५ रोजी बीड शहरामध्ये लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या थाटात साजरी झाली. यावर्षी अण्णाभाऊंच्या पुतळ्यासमोर ध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार होता. संपूर्ण शहराला उत्सुकता होती की कोणता झेंडा फडकवला जाणार – पिवळा झेंडा, निळा झेंडा की पंचशील ध्वज. बीड शहरात ज्यांच्या नेतृत्वामध्ये अण्णाभाऊ साठे यांची जयंती आयोजित केली जाते ते 'अजिंक्य भैय्या चांदणे', आत्माराम चांदणे साहेबांचा वारसा ते पुढे चालवत आहेत. बौद्ध धम्मानुसार आचरण आणि व्यवहार करणारे कुटुंब. सर्व विरोध मोडीत काढून, अजिंक्य भैय्यांनी साठे चौकात पंचशील ध्वज फडकवला. हा फक्त झेंडा नव्हे, ती क्रांतीची मशाल आहे.

बीड जिल्हा क्रांतिकारी जिल्हा आहे. मातंग बांधवांनी हजारोंच्या संख्येने बौद्ध धम्म स्वीकारला आहे. 'जय भीम' फक्त म्हणण्याचा विषय नाही, तर तो जगण्याचा विषय आहे – या विचारसूत्रातून कार्य करणारी नेतेमंडळी बीड जिल्ह्याने महाराष्ट्राला दिली. स्मृतीशेष एकनाथराव आव्हाड आणि आत्माराम चांदणे ही यातील आघाडीची दोन नावे. आंबेडकरवाद मांगवाड्यात पेरण्याचे काम या दोन लोकांनी केले. हनुमंतराव उपरे (ओबीसी) यांनी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली; तेही बीड जिल्ह्यातलेच. विद्यापीठाच्या नामांतरासाठी जो लाँग मार्च निघाला होता, त्या लाँग मार्चच्या आयोजनाची बैठक बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मांगवडगाव येथे झाली होती. श्रीरंग थोरात हे आयोजक. वेगवेगळ्या जिल्ह्यातून लाँग मार्च औरंगाबादला पोहोचणार होते. नागपूर हे औरंगाबादपासून दूर असल्याकारणाने, तिथून लाँग मार्चला सुरुवात झाली, आणि सर्वच जिल्ह्यातून लाँग मार्च औरंगाबादला निघाले. परंतु जोगेंद्र कवाडे सरांना विनाकारण लोकांनी लाँग मार्चचे प्रणेते करून टाकले. सांगण्याचा मुद्दा हा आहे की, बीड जिल्ह्यातील मातंग बांधव हे क्रांतिकारी आहेत. पैठणचे प्रा. डी. आर. कसाब, संभाजीनगरचे स्मृतीशेष जी. एस. दादा कांबळे, परतूरच्या नंदाताई लोखंडे, पाथरीचे विकास कांबळे उर्फ पाथरीकर,

मल्हार कसबे, संदीप दात्रे, परभणीचे लखन चव्हाण, कोल्हापूरचे प्रा. शरद गायकवाड सर, धम्मचारी प्रशिल, पुण्याचे प्रबुद्ध साठे, नागपूरचे चंद्रभाऊ ठाकरे इत्यादी ही मंडळी ताकदीने आंबेडकरवाद मांडतात आणि जगतात.

एकनाथराव आव्हाड उर्फ जिजा यांचा वैचारिक वारसा 'आझाद क्रांती सेना'चे संस्थापक राजेश भाऊ घोडे चालवत आहेत. गळ्यात निळा रुमाल टाकून संपूर्ण महाराष्ट्र पालथा घालत आहेत. वैचारिक स्पष्टता असणारा हा नेता बीड जिल्ह्यातील माजलगाव शहरातला. डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या माध्यमातून प्रा. सुकुमार कांबळे सर संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहेतच. सोबत प्रदेशाध्यक्ष अजिंक्य भैय्या चांदणे युवा नेतृत्व म्हणून महाराष्ट्रासमोर आलेले आहेत. युवा मातंग जातीच्या पोरांमध्ये आंबेडकरवाद पेरण्याचे महत्त्वाचे कार्य अजिंक्य भैय्या यांच्या हातून होत आहे. त्यांच्या कार्याचे दूरगामी परिणाम महाराष्ट्राला मिळतील, हे मात्र नक्की.

अण्णाभाऊ साठे यांच्या १००व्या जयंतीनिमित्त अण्णाभाऊ साठे : आंबेडकरी चळवळीच्या दृष्टिकोनातून नावाचा शोधग्रंथ कोरोना काळात लिहिला होता. त्या पुस्तकाचा महत्त्वाचा उद्देश म्हणजे बौद्ध (पूर्वश्रमीचे महार) आणि मातंग यांना जोडण्याचा पूल पुस्तकाने बनावे. आपला वैचारिक शत्रू या दोन समूहामध्ये भांडणे लावण्याचे कार्य करतो; आपण मात्र बंधुभाव (मित्रता) निर्माण करण्यासाठी सातत्याने कार्य केले पाहिजे.

माझ्या केज तालुक्यात गालफाडे सर गावोगावी जाऊन मातंग बांधवांना समजावून सांगतात की पंचशील ध्वजच साठे जयंतीला फडकवला पाहिजे. मागच्या वर्षी जवळपास २५ गावात त्यांनी पंचशील ध्वज फडकवला. जागृतीचा अग्नि सतत तेवत ठेवा, हा बाबासाहेबांचा संदेश सतत लक्षात ठेवला पाहिजे. शत्रू त्याचे कार्य सतत करत राहतो, आपण आपले कार्य करत राहिले पाहिजे.

घरामध्ये जसा झाडू दररोज मारावा लागतो; जर दोन दिवस झाडू मारला नाही, तर घरात ऑटोमॅटिक धूळ जमा होते; तसेच आपल्या मेंदूचे आहे – यालाही दररोज झाडावे लागते. घरातली धूळ एक वेळ परवडली, परंतु मेंदूवरची धूळ कधीही परवडणार नाही. खूप सारे मातंग बांधव यासाठी कार्य करत आहेत; काही बौद्ध बांधवसुद्धा यासाठी प्रामाणिक कार्य करत आहेत. याची गती वाढली पाहिजे. लोखंडाला वेल्डिंग जोडते, विटांना सिमेंट जोडते, माणसांना विचार जोडत असतात. त्यामुळे जोडणारा विचार बाळगावा लागतो.

आंबेडकरवाद हा जोडणारा विचार आहे – समता, बंधुत्व (मित्रता), न्याय आणि स्वातंत्र्यावर आधारित नवा समाज, नवे राष्ट्र, नवे जग निर्माण करणे हेच आंबेडकरवादाचे ध्येय आहे. 'जग बदल घालुनी घाव, सांगून गेले आम्हा भीमराव' – काय बदलायचे आहे? जग बदलायचे आहे. आपली गल्ली, गाव, तालुका, जिल्हा, राज्य, देश एवढ्यापुरते मर्यादित न राहता, जग बदलायचे आहे, हे अण्णाभाऊंनी आपल्याला सांगितले आहे. हे त्यांना बाबासाहेबांनी सांगितले आहे, आणि बाबासाहेबांना तथागत गौतम बुद्धांनी सांगितले आहे. जगाची पुनर्रचना करणे हाच धम्माचा उद्देश आहे.

सिद्धार्थ शिनगारे

संचालक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टू पॉलिटिक्स, बीड

बीडकर आणि पुरी भाजी

बीडचा माणुस जगात कुठल्याही हॉटेल मध्ये गेला तर सकाळी न्याहरीसाठी पुरी भाजी पहिली पसंती असणार. इतर मित्र सोबत असतील तर ते इडली सांबर, डोसा, उत्तप्पा, पोहे वगैरे मागवतील पण पक्का बीडकर पुरीभाजीच मागवणार. बरं ..हे इथेच थांबणार नाही ..पुरी भाजी सोबत भजी व कढी यायला हवीच. हे सर्व दिल्यावर तो जर कांदा विसरला तर त्याची गय नाही. आम्हा बीडकरांसाठी पुरी भाजी सकाळी जिव्हाळ्याचा व पर्वणीचा विषय

इतर जिल्ह्यापैकी वडा पाव मुबंईत, मिसळ पाव पुणे-नाशिक. पण न्याहरीला हॉटेल मध्ये खरा बीडकर जर गेला तर पुरीभाजी च प्रथम पसंती. खरं तर हा मेनु बीडच्या हॉटेल मध्ये न्याहारी साठी केव्हापासून आला माहीत नाही पण मला जसे आठवते बशीरगंज बीड मध्ये आपका हॉटेल होते. तिथे प्रसिद्ध पुरी भाजी होती. वडिलांच्या सोबत लहानपणी मी अनेकदा खाल्ली होती, ते नेहमी सोबत घेऊन जायचे. त्या सोबत भजी व कढी हमखास असायची.

भाजी मध्ये भजी कुस्करून टाकायची व पुन्हा वेटरला

रस्सा मागवायचा हे कौशल्य वडिलांनीच शिकविले.

पुढे इतर हॉटेलस् ने ही भाजी चे कौशल्य माहिती घेऊन की काय हा प्रकार एक संस्कृती केला आणि आम्हां बीडकरांसाठी ही एक ओळख बनवली.

पुढे सिटी हॉटेलची, धोंडीपुरातल्या चंपावतीची, मोंढ्यातली, नवी भाजी मंडईतली, नगर रोडची, सावतामाळी चौकची आणि इतर हॉटेल मध्ये ही सकाळी विविध शैलीत तुम्हाला पुरीभाजी हमखास मिळणार तीही अगदी अल्पदरात व तनमयतेने.

अलीकडे पुरी भाजीच्या नाश्त्यासोबत भजी, कढी आणि पापड तर येतेच येते, शिवाय मसाला राईस सुद्धा दिला जातो. नवी भाजी मंडई रस्त्यावरील हॉटेल आशियानात तर सकाळी सहा ते दुपारी तीन वाजेपर्यंत हमखास पुरी भाजी भेटते.

गेल्या जवळपास ४५ वर्षांपासून सुरू असलेल्या

धोंडीपुरा येथील सराफ लाईनच्या कोपऱ्याला असलेल्या रईस हॉटेलमध्ये तर आजही सकाळी सात ते अकरा वाजेपर्यंत दर्जेदार पुरी भाजी मिळते. सकाळी चार तासात या हॉटेलमध्ये पुरी भाजी चे प्रेमी खवय्ये पुरी भाजीसाठी आपला नंबर कधी येतो याची सुद्धा वाट पाहत बसलेले दिसून येतात.

आज एकीकडे पुरी भाजीसाठी अन्य हॉटेल्स मध्ये वेगवेगळ्या प्रकारची ताटे वापरली जाताना, रईस हॉटेलमध्ये आजच्या काळात सुद्धा पुरी एका बशी मधे आणि दुसऱ्या बशीत भाजी दिली जाते. तरीसुद्धा पुरीभाजी खाणारे मोठ्या आवडीने येथील चविष्ट पुरी भाजी खातात. एकदा सकाळचे अकरा वाजून गेले की नंतर मात्र येथे पुरी भाजी भेटत नाही.

प्रख्यात लेखक पु.लं.देशपांडे एकदा म्हणाले होते, हॉटेल मध्ये पुरी ला हलवुन हलवुन तेल काढून पुरीभाजी खाण्यात जी मजा आहे ना, ती कश्यातच नाही.

हा अनुभव सकाळी नाश्त्याला फक्त बीड मधेच येतो.

बरं ...तुम्ही बीड मध्ये कुठे ही सकाळी सकाळी नाष्टा करा. तिथे इतक्या अदबीने पुरीभाजीची सेवा मिळते की, जणु तुम्ही जर हॉटेल मध्ये येणे सोडले तर हॉटेल बंद होईल. अगदी मिठा पासुन ते पापडा पर्यंत तुमची सेवा होईल. पुरी भाजी सोबत इतका पाहुणचार फक्त बीडकर व बीड मधेच.

संयुक्तलेखन – अनंत सुतनासे
(निरक्षराचे शब्द...)
एस.एम.युसूफ़ (मुक्तपत्रकार)

दोनशे वर्षापूर्वीच्या महावटवृक्षाचे पुर्नरोपण; वृक्ष मित्रांचा पुढाकार

शेवटच्या श्वासापर्यंत वृक्ष संवर्धनाचे काम करणार : वृक्षमित्र सुधाकर देशमुख

केज । प्रतिनिधी

आंबेजोगाई कळंब राज्य मार्गाचे रुंदीकरण काम सुरू झाले आहे. यामुळे पालखी मार्गावरील हजारो झाडांची कत्तल केली जात आहे. रुंदीकरणानंतर नवी रोपे लावण्यात येणार आहेत असा फतवाही निघालेला आहे. क्रांती दिन, रक्षाबंधन असा दुहेरी संगम शनिवार दि ९ रोजी होता. त्यादिवशी बोरीसावरगाव जवळ महेश मुळे यांच्या हॉटेल समोरील दोनशे वर्ष जुने वडाचे अंदाजे पंचवीस फूट आकाराचे झाड पोकलेन च्या साह्याने काढून त्याचे दुसऱ्या जागी पुनर्रोपण करण्यात आले.

अशोक संगवे यांच्या हॉटेल समोरील पावणे दोनशे वर्षाचे जुने वडाचे झाड काल पुनर्रोपण करण्यात आले. वृक्षमित्र अभियानचे सुधाकर देशमुख, डॉ. हनुमंत सौदागर, सरपंच वैजनाथ

देशमुख, ॲड अनंत सोनवणे, महेश मुळे, योगेश देशमुख, नवनाथ अंबाड, अशोक संगवे, संतोष मुळे, राजेभाऊ पारेकर, दत्ता काकडे बंटी धिरे, विशाल बीडकर, यश कन्स्ट्रक्शन करण उजगरे, अशोक धायगुडे, विशाल गोरे, शाहीर तुकाराम सुवर्णकार, वसुदेव गायकवाड, मोनू देशमुख बाबासाहेब कोकाटे आदींच्या पुढाकारातून दोन वटवृक्षाचे पुनर्रोपण करण्यात आले.

या जुन्या वटवृक्षांना यामुळे जीवदान मिळाले आहे. वटवृक्षाचे पुनर्रोपण करणे काळाची गरज असल्याचे मत वृक्षप्रेमी डॉ. हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले. रस्त्याच्या दुतर्फा असणारी भली मोठी वडाची शेकडो झाडे काढले जात आहेत त्यामुळे रस्ता वसाड बनतो आहे. तात्काळ त्या रस्त्याच्या दुतर्फा नवीन वटवृक्षाची लागवड करायला हवी.

असे केले पुर्नरोपण

बुडाचा आकार गोलाई पस्तीस फूट असलेला हा महा वटवृक्ष होता. पोकलेन मशीनने वडाच्या सभोवताली मोठा खड्डा घेऊन झाड अलगत बाजूला काढण्यात आले. दुसऱ्या ठिकाणी २५ फुट रुंद व १५ फूट खोलीचा मोठा खड्डा घेऊन त्यामध्ये गांडूळ खत टाकले. वडाच्या खोडावर लिक्विड लावले गेले आणि त्यानंतर जशास तसे मुळासकट खोड त्या खड्ड्यात रोपण करण्यात आले. त्या वटवृक्षाचे पुनरोपण केल्यानंतर त्याची पूजा करून आनंद व्यक्त करण्यात आला. रोपे लावा झाडे जगवा अशी घोषणाबाजी करण्यात आली. वृक्ष प्रेमींनी वडाच्या झाडाला आलिंगन दिले. आजोबाच्या काळातील हा मोठा वटवृक्ष काढला जातो आहे. यामुळे दुःख आणि वेदना झाल्या. वटवृक्षाचे पुनर्पण करून आजोबांच्या आठवणी जपत आहोत.

– महेश मुळे

महामार्गावरील अशी मोठी वडाची झाडे वाचवण्यात यावीत यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन दिलेले आहे. शासन याकडे दुर्लक्ष करत आहे. लोकचळवळ आणि लोकसहभागातून जुन्या झाडांचे पुनर्रोपण काम सुरू केले आहे. यापूर्वी अनेक वेळा उपोषण आंदोलन करूनही वृक्ष गणना आणि पुनर्रोपणाचे काम दुर्लक्षित आहे. वड, नांदूरकी, पिंपळ अशी या मार्गावरील ५० हून अधिक झाडे पुनर्रोपण करता येतील. या महामार्गावरील अनेक वडाची झाडे वाचवता येतील. मोठ्या झाडांचे पुनर्रोपण करण्यात यावे सामाजिक वनीकरण आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी हे काम करायला हवे.

– वृक्षमित्र अभियान सुधाकर देशमुख

चंदनसावरगाव शिवारात विद्युत मोटार, केबलच्या चोरांचा धुमाकूळ

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील चंदन सावरगाव शिवारातील विद्युत मोटारींच्या केबल वायर ची चोरी होत असल्याने युसुफ वडगाव पोलीसां समोर चोरट्यांनी तपास करण्यासाठी आव्हान उभे केले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, शेतकरी अस्मानी व सुलतानी संकटाचा सामना करित असताना शेतातील विद्युत पंप, वायर चोरीच्या घटना वाढल्याने चिंतेत भर पडली आहे. केज तालुक्यातील चंदन सावरगाव शिवारातून शेतकऱ्यांच्या लाखोंच्या केबल वायरची चोरी गेल्या असून चोरटे शेत शिवारांमध्ये मोठ्या चोऱ्या करीत असल्याने शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.

केज तालुक्यातील चंदनसावरगाव रस्त्या लगत परिसरात शेतकऱ्यांचे विद्युत मोटार, स्टार्टर, पाईप, वायर



चोरणारी मोठी टोळी सक्रिय झाली असुन शेतकऱ्यांचे शेतातील साहित्य चोरीचे प्रमाण वाढले असल्याने शेतकरी मेटाकुटीस आला आहे. अंदाजे सात ते आठ शेतकऱ्यांच्या शेतातून चोरट्यानी मागील महिन्यात मध्यरात्री शंकरशिवाजी तपसे यांच्या शेतातील सर्व सोलर प्लेटची चोरी केली. तसेच दि.८ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी पुरुषोत्तम तपसे यांच्या शेतातील दोन पाणबुडी मोटर व वायर, व्यंकटी तपसे यांच्या विहिरीतील मोटार, वायर तसेच गणेश उकंडे यांच्या शेतातील पाणबुडी मोटार व वायर तर अशोक श्रीराम तपसे यांच्या शेतातील पाणबुडी मोटर, बाळासाहेब तपसे यांचे वायर असे चोरी झालेले आहे. दरम्यान युसुफ वडगाव पोलीसांनी याचा तपास करुन चोरीच्या घटनांना पायबंद घातला पाहिजे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

परळीत वैद्यनाथ बँक निवडणुकीत सरासरी एकुण ३७.५% मतदान

परळी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील अनेक भागात ग्रामीण अर्थवाहिणी म्हणून काम करणाऱ्या वैद्यनाथ सरकारी बँक संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणूक आज परळी शहरातील मतदान शांततेत झाले आहे. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे व मातोश्री प्रज्ञाताई मुंडे यांनी आज परळीत वैद्यनाथ बँक निवडणुकीसाठी मतदानाचा हक्क बजावला. वैद्यनाथ अर्बन कॉ.ॲप बँक लि.संचालक मंडळ निवडणूक जिल्हा बीड येथे मा.मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय येथील मतदान केंद्रात माझ्या मतदानाचा हक्क बजावला. केज शहरात खासदार बजरंग सोनवणे यांनी मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीत ३७.५ टक्के मतदान झाले असून मतदारांनी मतदानाकडे पाठ फिरवली आहे. मतमोजणी दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ८ वाजल्या पासून सुरू होणार आहे. या निवडणुकीचे निकाल स्थानिक राजकीय समीकरणांवर प्रभाव टाकण्याची शक्यता आहे.

ना. पंकजाताई मुंडे यांनी कुटुंबीयांसह बजावला मतदानाचा हक्क

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे व मातोश्री प्रज्ञाताई मुंडे यांनी आज परळीत वैद्यनाथ बँक निवडणुकीसाठी मतदानाचा हक्क बजावला. दरम्यान या निवडणुकीत लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलची बाजू भक्कम असून संपूर्ण पॅनलचा एकहाती विजय होण्याची शक्यता आहे. वैद्यनाथ अर्बन बँक संचालक मंडळाच्या एकूण १७ जागांसाठी ही निवडणूक झाली. तेरा जागांसाठी आज सर्वत्र मतदान शांततेत झाले. या निवडणुकीत ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनल रिंगणात उतरले आहे. या पॅनलच्या चार जागा या अगोदरच बिनविरोध निवडून आल्या आहेत. माजी खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे यांचा बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारात समावेश आहे. आज दुपारी शहरातील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या मतदान केंद्रावर जाऊन ना. पंकजाताई मुंडे, डॉ.प्रीतमताई मुंडे व प्रज्ञाताई मुंडे यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीत लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलची बाजू भक्कम असून येत्या १२ तारखेला मतमोजणीनंतर पॅनलचे सर्वच्या सर्व उमेदवार बहुमतांनी विजयी होतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

खा. बजरंग सोनवणे यांनी बजावला मतदानाचा हक्क

दि वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी दि.१० ऑगस्ट २०२५ रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीत बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केज शहरातील मतदान केंद्रावर आपला मतदानाचा हक्क बजावला. या निवडणुकीसाठी एकूण १७ जागांसाठी ७१ अर्ज दाखल झाले होते. त्यापैकी चार जागा बिनविरोध निवडून आल्या असून उर्वरित १३ जागांसाठी आज मतदान पार पडले. महिला प्रवर्गातील दोन जागांवर माजी खासदार डॉ. प्रीतम मुंडे आणि माधुरी योगेश मेनकुदळे यांची बिनविरोध निवड झाली आहे. अनुसूचित जाती प्रवर्गातून प्रा. विनोद जगतकर आणि इतर मागासवर्गीय प्रवर्गातून अनिल तांदळे यांचीही बिनविरोध निवड झाली आहे.

ब्राह्मण समाजाच्या विविध मागण्यासाठी संघर्ष समिती पाठपुरावा करणार

प्रसंगी आंदोलन छेडण्याचा बैठकीत निर्णय : कुलकर्णी

केज । प्रतिनिधी

समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती मागील अनेक वर्षापासून ब्राह्मण समाजाच्या उत्कर्षासाठी वेगवेगळी आंदोलन केली आहेत तसेच काही

मागण्या सरकारकडून मान्य देखील झाल्या परंतु अजूनही काही मागण्या बाकी आहेत यामध्ये पुरोहिताना मानधन देणे, ब्राह्मण संरक्षण कायदा लागु करणे, प्रत्येक जिल्ह्यात वस्तीगृह मिळावे, वेदपाठ शाळांना अनुदान द्यावे, मंदिरा वरील सरकारी नियंत्रण काढावे यासह अनेक मागण्यासाठी समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती पाठपुरावा करत राहील व ब्राह्मण समाजाच्या व हिंदू धर्म परंपरा यासाठी कार्य करत राहील असा निर्णय संघर्ष समिती च्या बैठकीत घेण्यात आला.

समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती च्या वतीने ब्राह्मण समाजाच्या उत्कर्षा साठी वेगवेगळी आंदोलने केली. यामध्ये धरणे आंदोलन, केज ते बीड मोटार सायकल रली मोर्चा, आझाद मैदानावरील धरणे आंदोलन, पळी ताम्हण वाजवून विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन अशी नियमीत आंदोलन केली आमरण उपोषण केले यामुळे शिक्षण प्रशिक्षणासाठी अमृत संस्था, परशुराम आर्थिक विकास महामंडळ तयार झाली तर केंद्र सरकार कडून इडब्लुएस आरक्षण, वेदभुषण, वेदविभुषण शिक्षणाला १० वी १२ वी चा दर्जा दिला अश्या काही मागण्या मान्य झाल्या असल्या तरी अजुन तरी अमृत संस्था कडून गरजुंना योग्य योजना तयार केलेल्या नाही आणि परशुराम आर्थिक विकास महा मंडळ अजुनही कार्यरत नाही तसेच पुरोहितांना मानधन, ब्राह्मण संरक्षण कायदा, के जी टु पि जी मोफत शिक्षण, प्रत्येक जिल्ह्यात ब्राह्मण मुलामुलींसाठी वस्तीगृह वेदपाठ शाळाना शासकीय अनुदान द्यावे मंदिरावरील शासकीय नियंत्रण काढावे या उर्वरीत मागण्यासाठी समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती नियमित पाठपुरावा करेल तसेच वेळ पडल्यास वेगवेगळ्या प्रकारची लोकशाही जपणारी आंदोलन केली जातील.

ब्राह्मण समाजाच्या शेवटच्या घटकापर्यत शासकीय योजना पोंहचली जात नाही तोपर्यंत तसेच ब्राह्मण समाजावर होणाऱ्या अन्यायाला संघर्ष समिती सतत लढा देत राहील असे समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष धनंजय कुलकर्णी, दिपक रणनवरे, श्रीकांत जोशी, ईश्वर दिक्षीत, चंद्रकांत पाटील, श्रीधर खोत, श्रीराम शेटे, पुरोहित कल्याणसमिती चे प्रदेशाध्यक्ष श्रीनिवास केजकर, ऋषीकेश जोशी, अनंत देवा कोकीळ, योगेश देवा जोशी, भीमाशंकर कुलकर्णी लातुर जिल्हा अध्यक्ष, प्रविण जोशी युवा कल्याण समिती मराठवाडा अध्यक्ष, सुहास कुलकर्णी यवतमाळ जिल्हाध्यक्ष विकास वाघ धाराशीव जिल्हाध्यक्ष, व्यवसाय कल्याण समिती मराठवाडा अध्यक्ष शिवराज मुथळे, बीड जिल्हा अध्यक्ष गजानन औसेकर, राहुल औसेकर आदींनी रविवार दि.१० ऑगस्ट रोजी केज येथे धनंजय कुलकर्णी यांचे निवासस्थानी झालेल्या बैठकीत आपले विचार मांडले. लवकरच पुढील बैठकीत रणनीती आखली जाणार आहे अशी माहिती संघर्ष समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी दिली आहे.

कोठी गावात विकासाचा उत्सव ग्रामपंचायत भवनासह विविध कामांचे लोकार्पण

महंत ह.भ.प.भगवान महाराज, खासदार बजरंग सोनवणे, माजी आमदार संगीता ठोंबरे यांची उपस्थिती

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे कोठी येथे ग्रामपंचायत भवनासह रस्ते, पाणीपुरवठा, प्रकाश व्यवस्था आणि इतर सार्वजनिक सोयीसुविधांच्या विविध कामांचा भव्य दिव्य लोकार्पण सोहळा रविवार दि.१० रोजी जल्लोषात पार पडला. ग्रामस्थांचा उत्साह आणि मान्यवरांची उपस्थिती यामुळे कार्यक्रमाला विशेष ऊर्जा भरली.

ठळक मुद्दे ग्रामपंचायत भवनासह अनेक विकासकामांचे लोकार्पण गावाच्या सर्वांगीण प्रगतीचा नवा टप्पा उपसरपंच बप्पा डोंगरे यांच्या कार्याचे कौतुक. सोहळ्याची वैशिष्ट्ये नव्याने बांधलेले ग्रामपंचायत भवन हे केवळ एक कार्यालय नसून गावाच्या प्रगतीचे केंद्रस्थान ठरणार आहे. सोबतच रस्ते दुरुस्ती, पाणीपुरवठा सुधारणा, वीजप्रकाश व्यवस्था आणि इतर महत्त्वाच्या कामांचे उद्घाटन करण्यात आले. महंत ह.भ.प. भगवान महाराज वरपगावकर यांच्या शुभहस्ते झाले. अध्यक्षस्थान रामराजे डोंगरे यांनी भूषविले, उद्घाटक म्हणून बीड जिल्ह्याचे खासदार मा.बजरंग बप्पा सोनवणे आणि प्रमुख पाहुणे माजी आमदार संगीता ताई ठोंबरे उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना मान्यवरांनी कोठी गावाच्या विकासासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले. तसेच कोठीचे उपसरपंच बप्पा डोंगरे यांच्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सदस्य पिंटू ठोंबरे, बंडू चौधरी, शेकाप नेते भाई मोहन गुंड, माजी पंचायत समिती सभापती ज्ञानेश्वर चौरे, केजचे नगरसेवक भाऊसाहेब गुंड, विलास जोगदंड, ग्रामसेवक गोरे, पंचक्रोशीतील विविध गावांचे सरपंच, पत्रकार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकीला ५४ दिवस, दुसरीला ४० दिवस उलटूनही अंभोरा पोलिसांना अपहरण झालेल्या मुली सापडेना!

दौलावडगाव । प्रतिनिधी

घरात झोपलेल्या अल्पवयीन मुलीला रात्रीच्या दरम्यान फुस लावून पळवून नेल्याची घटना घडून ५४ तर घरी कोणी नसल्याची संधी साधुन भरदिवसा पळवून नेऊन दुसरीला ४० दिवसाचा कालावधी उलटून गेला तरी देखील अंभोरा पोलिसांना अपहरण झालेल्या मुलीचा शोध लागत नसल्याने पोलिसांच्या तपासावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे.

कुटुंब बैचेन; शोध कधी लागणार

आष्टी तालुक्यातील एका गावातील १७ वर्षीय मुलगी १८ जुन रोजी नेहमी प्रमाणे तिच्या खोलीत झोपली होती. पण अचानक रात्रीच्या दरम्यान तिच्या खोलीचा दरवाजा उघडला दिसल्याने कुटुंबाने शोधाशोध केला. पण ती कुठेच मिळून आली नाही. दुसऱ्या दिवशी मुलीच्या वडिलांनी अंभोरा पोलिस ठाण्यात मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेल्या प्रकरणी कलम १३७(२) नुसार गुन्हा दाखल केला आहे. तर दुसरीकडे अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतीलच धानोरा येथील एका महाविद्यालयात शिक्षण घेणारी एका गावातील १७ वर्षीय मुलगी २ जुलै रोजी महाविद्यालयातून दुपारी घरी आली. आई, वडिल, भाऊ शेतात गेल्याने घरी कोणीच नव्हते. हीच संधी साधून गावातीलच २४ वर्षीय तरूणाने मित्रांच्या मदतीने तिचे अपहरण केले. कुटुंबाने अहिल्यानगर, पनवेल, पुणे, आळंदी, जामखेड, शेवगांव, सुतर यासह अन्य ठिकाणी शोधा शोध केली. पण मुलगी कुठेच आढळून आली नसल्याने दुसर्या दिवशी अंभोरा पोलिस ठाण्यात अज्ञात कारणांसाठी गावातीलच तरूणाने मित्रांच्या मदतीने तिचे अपहरण केल्याची तक्रार दिली. तक्रार देऊन ४० दिवस उलटले तरी देखील तिचा अद्याप शोध लागला नाही.

अंभोरा ठाण्यात चकरा मारल्या, नातेवाईकांकडे पाहणी करून चौकशी केली पण तिचा काही थांगपत्ता लागला नाही. पोलिसांकडून दखल योग्य घेतली जात नसल्याने आष्टीचे उपअधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक याच्याकडे धाव घेऊन निवेदन दिले तरी देखील तपासात कसलीच प्रगती झाली नाही. मुलीच्या जीवाचे काही बरे वाईट झाले आहे का? ती कुठे आहे, काय करतेय, कोणत्या अवस्थेत आहे. यामुळे कुटुंब भयभीत झाले आहे. पोलिसांनी तातडीने आमच्या मुलीचा शोध घ्यावा नसता बीड पोलिस अधिक्षक याच्या कार्यालयासमोर उपोषणास बसणार असल्याचा इशारा पिडितेच्या कुटूंबाने दिला असुन राज्याचे गृहमंत्री, महिला आयोगाच्या अध्यक्षा, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांना निवेदनाच्या प्रति दिल्या आहेत.

शफीक भाऊंना इम्तियाज जलील यांचा कौतुकाचा सन्मान

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत मोठा गिफ्ट देण्याच्या तयारीत

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

सामाजिक कार्यकर्ते आणि बीडमधील एमआयएमचे विश्वासू नेते जिल्हा अध्यक्ष ॲड. शेख शफीक भाऊ यांच्या समाजसेवेची दखल घेत औरंगाबादचे मा. खासदार आणि एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी त्यांचा विशेष सन्मान केला. मागील अनेक वर्षांपासून समाजसेवेचा वारसा घेऊन लोकांच्या हाकेला धावून जाणाऱ्या शफीक भाऊंच्या कार्याची थाप त्यांच्या पाठीवर मारत, जलील यांनी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत त्यांना मोठा गिफ्ट देण्याचे संकेत दिले.

मा.खा. इम्तियाज जलील यांच्या वाढदिवस कार्यक्रम निमित्त ॲड. शेख शफीक भाऊ आणि बीड जिल्ह्यातील आजी माजी पदाधिकारी, कार्यकर्ते औरंगाबाद येथे मा.खा. इम्तियाज जलील साहेब यांचा सत्कार करण्यासाठी गेले असता सत्कार झाल्यावर आपल्या गळ्यातील सत्काराचा हार काढून शफीक भाऊंच्या गळ्यात टाकला. या भावनिक क्षणात त्यांनी शफीक भाऊंच्या कार्याचा गौरव केला आणि त्यांना राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. शफीक भाऊंनी नेहमीच समाजातील प्रत्येक घटकासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. त्यांचा हा समर्पणाचा भाव आणि लोकांप्रती असलेली निष्ठा यामुळे पक्ष त्यांना मोठी जबाबदारी देण्यास उत्सुक आहे, असे जलील यांनी यावेळी सांगितले. शफीक भाऊंनी आपल्या समाजसेवेच्या माध्यमातून बीड आणि परिसरात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर विश्वास दाखवत येणाऱ्या निवडणुकीत महत्त्वाची भूमिका देण्याचे ठरवले आहे.

या सत्काराने शफीक भाऊंच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. हा सन्मान माझ्यासाठी खूप मोठा आहे. मी नेहमीप्रमाणे लोकांच्या सेवेत कटिबद्ध राहीन आणि येणाऱ्या काळात तुम्ही आणि पक्षाने दिलेली कोणतीही जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडेन, अशी प्रतिक्रिया शफीक भाऊंनी व्यक्त केली. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा सन्मान आणि जलील यांचे संकेत बीडमधील राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरले आहेत. या घटनेमुळे एमआयएमच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, शफीक भाऊंच्या नेतृत्वाखाली पक्ष स्थानिक निवडणुकीत मजबूत कामगिरी करेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

जिल्हा अध्यक्ष ॲड शेख शफीक भाऊ आणि बीड जिल्ह्यातील आजी माजी पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या हस्ते मा.खा. तथा प्रदेश अध्यक्ष इम्तियाज जलील यांचा वाढदिवसानिमित्त मोठ्या उत्साहात सत्कार करण्यात आला. लवकरच -खचखच् पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. बॅरिस्टर असदुद्दीन औवेसी साहेब व मा.खा. प्रदेश अध्यक्ष इम्तियाज जलील यांची बीड जिल्ह्यामध्ये सभा होणार आहे.

धोंडराई गावात झाडाला राखी बांधून पावसासाठी विद्यार्थिनीचे साकडे

गेवराई । प्रतिनिधी

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी वृक्षवल्ली पावन हनुमान मंदिर धोंडाराई ग्रुप तर्फे राखी फॉर नेचर या उपक्रम झाडांना राखी बांधून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कु. त्वरिता खरात सह अनेक विद्यार्थिनी सहभागी झाल्या व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थिनींनी १ मीटर व्यासाची राखी झाडाला बांधून रक्षाबंधन साजरे केले. निसर्गामध्ये झाड किती महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते, त्याची किती आवश्यकता आहे. याची जाणीव सर्वांनाच आहे. प्रत्येक झाड जगले पाहिजे, झाडाचे संवर्धन झाले पाहिजे, असे प्रतिपादन राजेंद्र साखरे यांनी केले. या वेळी सजीव सृष्टीचे रक्षण करणाऱ्या निसर्गाला मानवजातीच्या रक्षणाचे आवाहन करण्यात आले. विद्यार्थिनींनी झाडाला राखी बांधून भाऊ मानून, तुझी आम्हाला गरज असल्याचे मत त्वरिता खरात व्यक्त केले.

पावन हनुमान मंदिर ग्रुप च्या विद्यमाने 'झाडांसोबत रक्षाबंधन' हा अनोखा उपक्रम साजरा करत मुलींच्या हस्ते झाडांना राखी बांधण्यात आली. हा उपक्रम रक्षाबंधन सणाच्या पूर्वसंध्येला राबविण्यात आला. 'माझा वृक्ष भाऊ माझा श्वास', अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. यावेळी मुलींनी झाडाला राखी बांधून 'हे वृक्ष भाऊराया मानवाचे रक्षण कर, गेवराईसह धोंडराई गावात धो धो पाऊस पाड' असे साकडे पावन हनुमानाकडे घातले आणि झाडांचे औक्षण केले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणाची शपथ घेतली. यावेळी झाडांना फुगे बांधून सजावट करण्यात आली होती. यंदा बीड जिल्ह्यात म्हणावा तसा पाऊस झालेला नाही त्यामुळे बळीराजा चिंतीत आहे. झाडांची संख्या वाढणे गरजेचे असून, प्रत्येकाने दरवर्षी किमान एक वृक्ष लागवड करून लावलेल्या झाडांचे संवर्धन करण्याची गरज आहे. यावेळी मुलींनी झाडांना राखी बांधून गेवराईला धो धो पाऊस पडावा यासाठी साकडे घातले. झाडांसोबत रक्षाबंधन या अनोख्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT